# जिल्हयातील पाणी पुरवठा बाबतची माहिती

**अमरावती जिल्हयात एकुण १४ तालुके व ८३९ ग्रामपंचायती  यामध्ये १५९१ गावांचा समावेश आहे. जिल्हयात खालील प्रमाणे पाणी पुरवठयाच्या सोयी उपलब्ध आहे**

- एकुण स्वतंत्र नळ पाणी पुरवठ योजना :- ११३३
- एकुण सुरु असलेल्या प्रोदशिक योजना :- ०३
- विद्युत पंप :- २२१
- कार्यरत हातपंप :- ४९६७
- दुहेरी पंप विद्युत वरील :- २३ व सौर उर्जेवर :- ३०
- स्वतंत्र योजनेव्दारे पाणी पुरवठा होत असलेली गावे  :- ११८७
- प्रादेशिक योजनेचा पाणी पुरवठा असलेली गावे :- ३१७

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (यंत्रणा :- जिल्हा परिषद)

➢ ग्रामीण भागाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सन २००९-१० पासुन लोकसहभागातुन मागणी आधारीत पाणी पुरवठा योजना घेणेकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

➢ योजनेची अंमलबजावणी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येते.

➢ योजनेची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व्याप्ती पाणी गुणवत्ता व स्त्रोत शाश्वती असे तीन भागामध्ये योजना राबविण्यात येते.

➢ ज्या गावांना दरडोई दरदिवशी ४० लिटर पेक्षा कमी पाणी पुरवठा होतो अश्या गावांची योजना घेणेकरीता निवड करण्यात येते.

➢ ज्या गावांचे उद्‌भव अर्सेनिक /फ्लोराईड मुळे बाधित आहे.अश्या गावांना प्राधान्य देण्यात येते.

➢ मात्र योजनेत सहभागी होण्यापुर्वी गाव कमीत कमी ६०% हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे. व सदर गाव टप्याटप्याने १००% हागदारी मुक्त झाले पाहिजे असे हमीपत्र ग्रामसभेच्या ठरावाव्दारे सादर करावे.

➢ सांसद आदर्श ग्राम योजनेमध्ये समाविष्ट गावांची आवश्यकते नुसार गावांचे निवडीस प्राधान्य देण्यात येते.

➢ प्रस्तावित नळ योजनेमध्ये स्त्रोत बळकटीकरण व १००% घरगुती नळ जोडण्यांचा समावेश अनिवार्य आहे.

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (यंत्रणा :- जिल्हा परिषद)

- सद्यास्थितीत योजनेसाठी असलेली लोकवर्गणीची अट पुर्णत: रद्द करण्यात आली आहे.
- रु.५०.०० लक्ष किंमती पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता ग्रामसभा देते.
- रु.५०.०० लक्ष ते ५.०० कोटी पर्यंतच्या योजनेस जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समिती प्रशासकीय मान्यता देते.
- रु.५.०० कोटी पेक्षा जास्त खर्चाच्या योजना प्रशासकीय मान्यता करीता शासन स्तरावर सादर करण्यात येतात.
- सदर कार्यक्रमात केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ५०-५०% एवढा आहे.
- एक वर्षापर्यंत योजना कंत्राटदारा मार्फत चालविणे बंधनकारक आहे.
- कामाचे संनियंत्रण ग्रामीण पाणी पुरवठा विभागा मार्फत करण्यात येते.
- रु.५.०० कोटी पर्यंतच्या योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत/ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करेल व रु.५.०० कोटी किंमती वरील स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मार्फत करण्यात येईल.
- योजना पुर्णत्वा नंतर योजनेच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायत/ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची राहिल.

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (यंत्रणा :- जिल्हा परिषद)

➢ रु.५.०० कोटी पर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी तांत्रिकदृष्टया योग्य प्रकारे होईल याकरीता योजनांची तांत्रिक गुणवत्ता तपासणी रु.५०.०० लक्ष ते रु.२.५ कोटी पर्यंतच्या योजनांसाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणांच्या अधिक्षक अभियंता मार्फत व रु.२.५ ते रु.५.०० कोटी पर्यंतच्या योजनांची गुणवत्ता तपासणी मजिप्राच्या मुख्य अभियंता मार्फत करण्यात येईल.

➢गावातील सर्व नागरीकांना किमान ४० लिटर दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा करणेकरीता गावांचे मागणीनुसार दरवर्षी योजनेचा गावनिहाय कृती आराखडा करण्यात येतो.

➢ योजनेच्या अंमलबजावणी करीता ग्रामपंचायतीस शासन हिश्याची ९०% रक्कमेपैकी पहिला हप्ता ३०% दुसरा हप्ता ३०% व तिसरा हप्ता ३०% या प्रमाणात विरीत करण्यात येतो व उर्वरीत १०% निधी योजना पुढील एक वर्ष यशस्वीरित्या चालविण्यानंतर अदा करण्यात येतो.

➢ एका विशिष्ट वर्षाच्या कृती आराखडया मध्ये समाविष्ट मान्य योजना पुढील वर्षाच्या कृती आराखडयामध्ये आपोआप प्रगतीपथावरील योजना म्हणुन समाविष्ट होतील.

➢ सन २०१५-१६ यावर्षी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम निधी वितरणाच्या केंद्र शासनाच्या धोरणात बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सन २०१५-१६ च्याकृती आराखडयामध्ये कोणत्याही नविन पाणी पुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात येवु नये अश्या मा.प्रधान सचिव यांना पत्र क्रं पापुशा/प्र.क्र १६६/२०१५/वासो०१ दि.१४/०५/२०१५ अन्वये देण्यात आल्या होत्या.

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (यंत्रणा :- जिल्हा परिषद)

➢ सन २०१६-१७ चा कृती आराखडा खालील नमुद केलेले मुद्दे विचारात घेवुन कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना आहे.

➢ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत सन २०१५-१६ पासुन केंद्र हिस्सा अंतर्गत निधी मध्ये कपात केली असल्याने राज्य हिस्सा अंतर्गत जास्तीत जास्त तरतुद जिल्हा नियोजन समिती सभेमध्ये (DPDC) मध्ये करण्यात यावी.

➢ केंद्र हिस्सा अंतर्गत प्राप्त होणारा निधी ५ वर्षापेक्षा कमी कालावधीतील योजनांवर खर्च करण्यात यावा.

➢ अ) योजनेचा प्राधान्य क्रम

१) १००% भौतिकदृष्टया पुर्ण परंतु आर्थिकदृष्टया अपुर्ण असलेल्या योजना, २) पाणी पुरवठा सुरु केलेल्या परंतु भौतिकदृष्टया अपुर्ण असलेल्या योजना, ३) प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना

ब) नविन प्रस्तावित योजना

१) अर्सेनिक/फ्लोराईड बाधित, सासंद आदर्श ग्राम योजनेतंर्गत समाविष्ट व केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या संकेतस्थळावरील नोंदीनुसार तपासणी केलेल्या हागणदारी मुक्त ग्रामपंचायती /गावामधील अशंत: हाताळलेल्या वाडया वस्त्यासाठी पाणी पुरवठा योजना

२) आर्युमान संपलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुर्नजीवन/आधुनिकीकरण बाबतच्या योजना.

३) ज्या गावांमध्ये भारत निर्माण/राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत यापुर्वी योजना राबविली नाही अश्या गावांना मागणी असल्यास प्राधान्य देण्यात यावे.

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (यंत्रणा :- जिल्हा परिषद)

➢ केंद्र व राज्य हिस्सा अंतर्गत उपलब्ध असलेली तरतुद विचारात घेवुन केंद्र व राज्य हिस्साच्या समप्रमाणात केवळ पुढील वर्गवारीतील योजनांचा कृती आराखडयात समावेश करावा. १) आर्सेनिक/फ्लारोईड बाधित गावे वाडया, २) सांसद आदर्श ग्राम योजनेस समावेश असलेली गावे, ३) हागणदारी मुक्त असलेली गावे

➢ केवळ राज्य हिस्सा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतुन (DPDC) पुढील योजनांसाठी संपुर्ण तरतुद करण्यात यावी. सदर योजनांसाठी केंद्र निधीची तरतुद करण्यात येवु नये. १) २५% पेक्षा कमी प्रगती असलेल्या योजना, २) ५ वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेल्या योजना, ३) विस्तारीत (Augmentation) पाणी पुरवठा योजना , ४) नळ पाणी पुरवठा योजना नसलेल्या गावांसाठी नविन योजना , ५) नियोजन विभागाकडून सदर योजनांसाठी तरतुद उपलब्ध होत असल्याची खात्री झाल्यानंतरच सन २०१७-१८ च्या कृती आराखडयात अश्या योजनांचा समावेश करण्यात यावा व सन २०१७-१८ च्या कृती आराखडयास राज्यस्तरीत योजना मंजुरी समितीची मान्यता मिळाल्यानंतरच व राज्यहिस्सा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतुन (DPDC) निधी उपलब्ध झाल्यानंतरच नविन प्रस्तावित योजना हाती घेण्यात याव्या.

# मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP)

- सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार
- शासन निर्णय क्रं.ग्रापाधो-१११५/प्र.क्र९२/पापु०७/ दि.७ मे २०१६.

- कार्यक्रमाची उदिष्टे :- राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे शुध्द व पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे व ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजना राबविणे.
- कार्यक्रमाची व्याप्ती :- राज्यातील सर्व ग्रामीण भागात लागु राहिल.
- कार्यक्रमाचे वर्गीकरण :- १) MRDWP अंतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना.
  २) NRDWP अंतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन
  ३) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती
- कार्यक्रमातंर्गत योजनांची तांत्रिक मान्यता :-

| कार्यक्रमातंर्गत योजनांची तांत्रिक मान्यता :- | कार्यकारी अभियंता | अधिक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
|---|---|---|---|
| १) स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | २ कोटी पर्यंत | २ ते ७.५ कोटी पर्यंत | ७.५ कोटीच्या वर |
| २) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | २ कोटी पर्यंत | २ ते ७.५ कोटी पर्यंत | ७.५ कोटीच्या वर |

# मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP)

- कार्यक्रमा अंतर्गत प्रशासकीय मान्यता :- मा.मु.का.अ पा.पु.व स्व विभाग (शासन)

| | | |
|---|---|---|
| १) स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा | ५ कोटी पर्यंत | ५ कोटी पेक्षा अधिक |
| २) प्रादेशीक ग्रामीण पाणी पुरवठा | ५ कोटी पर्यंत | ५ कोटी पेक्षा अधिक |

शासन निर्णयातील परिशिष्ट - अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या योजनाच MRDWP मधुन राबविण्यात येतील. या योजनांव्यतिरिक्त अन्य योजना घेण्याचे अधिकार मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखालील समितीस राहिल.

# पाणी टंचाई कार्यक्रम

शासन निर्णय क्रं.टंचाई-१०९९/प्र.क्र१२/ पापु१४ मंत्रालय मुंबई दि. ३ फेब्रुवारी १९९९ ज्या गावांच्या १.५० कि.मी च्या परीसरातील सार्वजनिक उद्‌भवातुन दरडोई दरदिवशी २० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध होत असल्यास खालील उपाययोजना पाणी टंचाई अंतर्गत वरील शासन निर्णयानुसार घेता येतील.

- विहिरी खोल करणे/ विहिरीतील गाळ काढणे
- खाजगी विहिरीचे अधिग्रहण करणे
- टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे
- नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे
- विंधन विहिरी घेणे
- तात्पुरती नळ योजना घेणे
- गटविकास अधिकारी व तहसिलदार हयांचे प्रपत्र अ व ब तसेच स्त्रोताबाबत सहाय्यक भुवैज्ञानिक हयांचे शिफारसीने तसेच ग्रामपंचायतच्या मागणीनुसार आवश्यकतेनुसार उपाययोजना प्रस्तावित करण्यात येतात.
- मा.जिल्हाधिकारी यांना तात्पुरती पुरक योजना ५ कि.मी च्या आत व २०.०० लक्ष रुपयापर्यंतचे मंजुरीचे अधिकार आहेत. तसेच मा.आयुक्त यांना ५०.०० लक्ष रुपये पर्यंतचे अधिकार आहेत. तसेच नळ योजना विशेष दुरुस्तीचे रु.३०.०० लक्ष पर्यंतचे मा.जिल्हधकारी व रु.५०.०० लक्ष पर्यंतचे अधिकार मा.आयुक्त यांना आहेत.

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. अमरावती प्रशासकीय रचना

**कार्यकारी अभियंता**

|

**उपकार्यकारी अभियंता**

|

| **उपविभाग** | उपविभागीय अभियंता उपविभाग अमरावती क्र.१ | उपविभागीय अभियंता उपविभाग अमरावती क्र.२ | उपविभागीय अभियंता उपविभाग चांदुर रेल्वे | उपविभागीय अभियंता उपविभाग मोर्शी | उपविभागीय अभियंता उपविभाग धारणी | उपविभागीय अभियंता उपविभाग अचलपुर | उपविभागीय अभियंता उपविभाग अंजनगाव सुर्जी | उपविभागीय अभियंता यांत्रिकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **समाविष्ट तालुके** | १) अमरावती २) नांदगाव खंडेश्वर | १) भातकुली २) तिवसा | १)चांदुर रेल्वे २) धामणगाव रेल्वे | १) मोर्शी २) वरुड | १) चिखलदरा २) धारणी | १) अचलपुर २) चांदुर बाजार | १) अंजनगाव सुर्जी २) दर्यापुर | संपुर्ण जिल्हा |